# हॉकीचे जादूगर मेजर ध्यानचंद

आज २९ ऑगस्ट, राष्ट्रीय क्रीडा दिन. हॉकीचे महान खेळाडू मेजर ध्यानचंद या महान खेळाडूचा गौरव म्हणून हा दिवस राष्ट्रीय क्रीडा दिन म्हणून देशभर साजरा केला जातो. या दिवशी राष्ट्रपतींच्या हस्ते खेळाडूंना खेलरत्न पुरस्कार, अर्जुन पुरस्कार आणि द्रोणाचार्य पुरस्कारांचे वितरण केले जाते. शिवाय खेळातील सर्वोच्च जीवनगौरव पुरस्कार म्हणून २००२ पासून मेजर ध्यानचंद पुरस्कार देण्यात येतो. आपल्या कारकिर्दीत खेळात असामान्य कर्तृत्व दाखवणाऱ्या आणि निवृत्तीनंतरही त्या खेळासाठी जीवन वेचणाऱ्या क्रीडापटूला मेजर ध्यानचंद जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात येते. भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी खेलरत्न पुरस्काराला देखील मेजर ध्यानचंद यांचे नाव देऊन मेजर ध्यानचंद यांच्या कार्याचा यथोचित असा गौरव केला आहे. ज्या खेळाडूंनी वर्षभर सर्वोत्तम कामगिरी करून जागतिक पातळीवर देशाचे नाव उज्ज्वल केले आहे अशा खेळाडूंना हा पुरस्कार दिला जातो. हा पुरस्कार क्रिडा क्षेत्रातील सर्वोच्च पुरस्कार समजला जातो.

२९ ऑगस्ट १९०५ रोजी उत्तरप्रदेश मधील अलाहाबाद येथे मेजर ध्यानचंद यांचा जन्म झाला. त्यांचे वडील सोमेश्वर दत्त हे आर्मीमध्ये असल्याने त्यांच्या वारंवार बदल्या होत. वडिलांच्या निवृत्तीनंतर १९२२ मध्ये वयाच्या सोळाव्या वर्षी ते स्वतः आर्मीत दाखल झाले. त्यावेळी ते आर्मीच्या रेजिमेंटमध्ये होणाऱ्या हॉकी सामन्यात खेळत असे. हॉकीतील त्यांचे कौशल्य पाहून मेजर बाले तिवारी यांनी त्यांना हॉकीमधील बारकावे शिकवले. ते त्यांचे हॉकीमधील गुरू होते. पुढे मेजर ध्यानचंद हॉकीमध्ये इतके रमले की हॉकी हाच त्यांचा जीव की प्राण ठरला. १९२२ ते १९२६ या कालावधीत त्यांनी रेजिमेंटच्या विविध स्पर्धांमध्ये आपले कौशल्य दाखवले. हॉकीतील त्यांच्या कर्तुत्वामुळे न्यूझीलंड दौऱ्यावर जाणाऱ्या इंडियन आर्मी संघात त्यांची निवड झाली. हा दौरा त्यांनी गाजवला. या दौऱ्यात त्यांनी आपल्या संघाला १८ विजय मिळवून दिले. दोन लढती बरोबरीत सुटल्या तर केवळ एका लढतीत पराभव स्वीकारला. हा दौरा त्यांच्यासाठी टर्निंग पॉईंट ठरला. या दौऱ्याने त्यांना जगभर नाव मिळवून दिले. या दौऱ्यानंतर त्यांना लान्स नायक म्हणून बढती मिळाली. केवळ भारतातीलच नाही तर जगभरातील दिग्गज खेळाडू त्यांच्या खेळाच्या प्रेमात पडले. मेजर ध्यानचंद यांचे हॉकी खेळण्याचे कौशल्य अफलातून होते. चेंडूवरचे नियंत्रण ही त्यांची खासियत होती. चेंडू त्यांच्या ताब्यात असताना, मैदानात कोणी खेळत नाही असेच वाटायचे. चेंडू त्यांच्या स्टीक जवळून हलतच नसे म्हणून त्यांच्या स्टिकमध्ये चुंबक बसवला आहे अशी अफवा तेंव्हा पसरली होती. हॉकी हा सांघिक खेळ आहे तो संघ भावनेनेच खेळला पाहिजे असे त्यांचे मत होते म्हणूनच चेंडूवर अफलातून नियंत्रण असूनही ते आपल्या सहकाऱ्यांना अचूक पास द्यायचे. हॉकीतील त्यांच्या या कौशल्यामुळेच त्यांना हॉकीचे जादूगार असे म्हटले जाते. मेजर ध्यानचंद यांनी आपल्या जादुई खेळाने देशाला १९२८ (एमस्टरडॅम) १९३१ (लॉस अँजेलीस) १९३६ (बर्लिन) अशा सलग तीन ऑलिम्पिक स्पर्धांमध्ये सुवर्णपदक जिंकून दिले होते. १९३६ मधील भारत जर्मनी यांच्यात झालेल्या ऑलिम्पिकच्या अंतिम लढतीत ध्यानचंद यांनी एकहाती विजय मिळवून दिला होता. ही लढत पाहायला जर्मनीचे हुकूमशहा एडॉल्फ हिटलर उपस्थित होते. ध्यानचंद यांच्या खेळाने ते चांगलेच प्रभावित झाले. ध्यानचंद यांच्या हॉकीतील कौशल्याने जर्मनीचा हुकूमशहा एडॉल्फ हिटलर यांनाही वेड लावले होते. त्यांच्या असामान्य कौशल्याने भारावलेल्या हिटलर यांनी त्यांना जर्मन नागरिकत्व देण्याची तसेच इंग्लिश इंडियन आर्मीत मेजरपद व कर्नल पदापर्यंत बढती देण्याचीही ऑफर दिली होती ; पण देशप्रेमी आणि स्वाभिमानी ध्यानचंद यांनी ती नम्रपणे नाकारली होती. लॉस अँजेलीस मध्ये खेळलेल्या भारतीय संघाचे वर्णन एका अमेरिकन पत्रकाराने पूर्वे कडील वादळ असे केले होते. ध्यानचंद १९५६ मध्ये निवृत्त झाले. त्याचवर्षी भारत सरकारने त्यांना पद्मभूषण देऊन गौरवले. निवृत्तीनंतर पटियाला येथील क्रीडा संस्थेत मुख्य प्रशिक्षक म्हणून त्यांनी तरुण खेळाडूंना प्रशिक्षण दिले. ३ डिसेंबर १९७९ रोजी या महान खेळाडूचे निधन झाले. भारताला सुवर्णयुगाची अनुभूती देणाऱ्या या महान हॉकीच्या जादूगाराला मरणोत्तर भारतरत्न पुरस्काराने गौरवावे अशीच तमाम भारतीय क्रीडा रसिकांची इच्छा आहे. हॉकीचे जादुगर मेजर ध्यानचंद यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन !



श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड, जिल्हा पुणे
९९२२५४६२९५
समाजसंवाद

# स्वराज्याचा मार्ग हीच युवा स्वाभिमान पक्षाची प्रेरणा– माटा

**श्रीरामपूर | शफीक बागवान**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेले संविधानिक मूल्ये आणि छत्रपती शिवाजी महाराजांनी दिलेला शौर्य व स्वराज्याचा मार्ग हीच युवा स्वाभिमान पक्षाची प्रेरणा असल्याचे स्पष्ट प्रतिपादन पक्षाचे जिल्हाध्यक्ष विवेक माटा यांनी केले. अहिल्यानगर जिल्ह्यात आज ऐतिहासिक क्षण घडला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस अभिवादन करून युवा स्वाभिमान पक्षाची जिल्ह्यातील कामास अधिकृत सुरुवात करण्यात आली असल्याची घोषणा पक्षाचे जिल्हाध्यक्ष विवेक माटा यांनी केली. युवा स्वाभिमान पक्षाचे संस्थापक अध्यक्ष, आमदार रवीभाऊ राणा यांच्या प्रेरणेतून जिल्ह्यात या पक्षाची सुरुवात झाली असून, युवकांना न्याय, समानता आणि स्वाभिमानाचा नवा मंच मिळाला आहे. या प्रसंगी उपस्थित मान्यवर, कार्यकर्ते आणि युवा बांधवांच्या उपस्थितीत पक्षाची ध्येयधोरणे जाहीर करण्यात आली. जिल्ह्यातील युवकांच्या नेतृत्वाखाली लढणारा हा पक्ष सर्वसामान्य जनतेच्या हक्कासाठी व स्वाभिमानासाठी सज्ज झाला असल्याचे विवेक माटा म्हणाले.




या वेळी राकेश मगन सोज्वळ, विशाल रविंद्र कदम, राजेंद्र गंगाधर भालेराव, ललित सुभाष नाईकवाडे, सुभाष धडकु तिरमली, तुकाराम रामचंद्र रसाळ, नितीन राजकुमार बांगा, प्रविण बांगा, सिध्दार्थ अशोक शेटे, अन्वर भैय्या पटेल, शुभम राजेंद्र बोरकर, विशाल संतोष आव्हाड, मोहित दिपक इंगळे, आदित्य अशोक शिंदे आदींसह असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

## लोकमान्यांच्या गणेशोत्सवाची मूळ संकल्पना कुठे हरवली?

# आरास नव्हे तर जागृती; गोंगाट नव्हे तर विचारांची ज्योत

## हीच टिळकांच्या गणेशोत्सवाची खरी ओळख



भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील अविस्मरणीय व्यक्तिमत्त्व म्हणजे लोकमान्य बाळ गंगाधर टिळक. त्यांनी उभारलेला सार्वजनिक गणेशोत्सव हा केवळ धार्मिक सोहळा नव्हता, तर तो एक सामाजिक आणि राजकीय क्रांतीचा दीपस्तंभ होता. गणपती हा घराघरातील भक्तीचा देव; परंतु टिळकांनी त्याला सार्वजनिक पातळीवर आणून समाजाच्या हृदयात एकता, ऐक्य आणि जागृतीचा दिवा प्रज्वलित केला. त्या उत्सवाच्या गजरात देशभक्तीचे गीत झंकारले, तरुणांच्या मनात स्वराज्याची ठिणगी पेटली आणि गुलामगिरीतल्या भारताला स्वातंत्र्याचा श्वास जाणवला. तो गणेशोत्सव म्हणजे विचारमंथनाचे व्यासपीठ, जनतेच्या वेदना मांडण्याचे साधन, समाजातील जातीभेदावर फुंकर घालणारा शुद्ध आत्मभाव. देवाच्या पायरीवर सारे समान हा संदेश समाजाच्या प्रत्येक शिरेशिरेत भिनवण्याची ताकद या उत्सवात होती. त्यातून केवळ पूजाअर्चा नव्हे, तर व्याख्याने, नाटके, कीर्तनं, देशभक्तीपर गीतांद्वारे स्वराज्याचा मंत्र जनतेला मिळत होता. हेच टिळकांचे स्वप्न होते गणरायाच्या मंडपातून स्वराज्याचा गजर व्हावा. मात्र काळाच्या ओघात या संकल्पनेचे रूपांतर झाले आणि जे परिवर्तनाचे व्यासपीठ होते ते हळूहळू प्रदर्शनाच्या झगमगाटात हरवले. आजचे चित्र वेगळेच दिसते. प्रचंड अवाढव्य मूर्ती, महागड्या सजावट, डीजेच्या कर्णकर्कश आवाजात हरवलेले भजन, गर्दीत विसरलेली भक्ती, राजकीय नेत्यांच्या छायेत झाकोळलेली समाजजागृती आणि व्यावसायिकतेच्या नफ्यात गिळंकृत झालेले सांस्कृतिक मूल्य ही वस्तुस्थिती आहे. श्रद्धा ही जिव्हाळ्याची भावना राहिली नाही, तर ती दिखाव्याच्या धामधुमीत दडपून गेली. पर्यावरणाचा ऱ्हास, नदी-तलावांचे प्रदूषण, आवाजाचा त्रास आणि वाहतुकीची कोंडी या सर्व विसंगतींनी लोकमान्यांच्या संकल्पनेवर जणू काळा धूरच फासला. आज प्रश्न उभा राहतो टिळकांच्या संकल्पनेला सुरुंग कोणी लावला? केवळ राजकारण्यांनी का? केवळ व्यावसायिकांनी का? की आपण सर्वांनी मिळून या संकल्पनेचे अध:पतन घडवून आणले? कारण उत्सवाच्या माध्यमातून समाजजागृती घडवण्याऐवजी आपण त्याला नुसता सोहळा, नुसती दिखाऊ स्पर्धा, नुसता कोलाहल बनवून टाकला आहे. आपण विसरलो की, गणेशोत्सव हा फक्त दहा दिवसांचा गडबडीचा कल्लोळ नव्हे, तर तो एक प्रेरणा आहे समाजाला बांधणारी, एकत्र आणणारी, न्याय-अन्यायाचा विचार करणारी. आजच्या काळात माध्यमांचा व समाजमाध्यमांचा प्रभावही प्रचंड आहे. थेट प्रक्षेपण, लाईव्ह अपडेट्स, स्पर्धात्मक मंडळांच्या जाहिराती यातून भक्तीचे नव्हे, तर स्पर्धेचे प्रदर्शन घडते. यातून मूळ उद्देश झाकोळला जातो. मात्र माध्यमांची ही ताकद सकारात्मकतेसाठी वापरली तर? पर्यावरणपूरक मूर्तींचा प्रचार, सामाजिक उपक्रमांचे कौतुक, आणि उत्तम कार्याची प्रेरणा हे सर्व समाजाला नवी दिशा देऊ शकते. मात्र अजूनही सर्व काही हरवलेले नाही. अनेक मंडळे आजही रक्तदान, आरोग्य शिबिरे, शालेय मदत, पर्यावरणपूरक मूर्ती या मार्गाने समाजकारणाची वाट धरताना दिसतात. हे चित्र आशेचा किरण दाखवते. आपली जबाबदारी आहे की हा किरण अधिक तेजोमय करावा. आपणच ठरवायचे आहे की गणेशोत्सव हा समाजजागृतीचा दीपस्तंभ राहील की गोंगाटात हरवलेली सामाजिक जत्रा? लोकमान्यांनी दिलेली प्रेरणा आपल्याला पुन्हा जागवावी लागेल. गणेशोत्सव हा विचारांचा उत्सव बनवावा लागेल. मूर्ती मातीची असावी, पण आपले विचार लोखंडासारखे कठीण असावेत. सजावट साधी असावी, पण अंत:करणातील श्रद्धा झगमगावी. गजर जोराचा असावा, पण तो समाजजागृतीचा असावा. टिळकांच्या संकल्पनेला पुन्हा तेजस्वी करणे ही आपली जबाबदारी आहे, कारण गणेशोत्सव हा केवळ उत्सव नाही तो आपल्या राष्ट्रीय अस्तित्वाचा, आपल्या सांस्कृतिक ओळखीचा, आणि आपल्या सामाजिक जबाबदारीचं अधिष्ठान आहे. लोकमान्यांनी प्रज्वलित केलेला हा दीप आजही विझलेला नाही, फक्त त्याभोवती धुरकटलेली अवनतीची सावली आहे. आपणच ती झाडून टाकली पाहिजे. गणेशोत्सवाला पुन्हा समाजजागृतीचे, ऐक्याचे, संस्कृतीरक्षणाचे व्यासपीठ बनवणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. गणरायाच्या साक्षीने आपण स्वतःला प्रश्न विचारू या आपण या उत्सवाला खऱ्या अर्थाने पवित्र ठेवतो आहोत का? ''गणपती बाप्पा मोरया'' च्या जयघोषात फक्त भक्ती नव्हे, तर कर्तव्याची जाणीव, जबाबदारीची जाणीव आणि परिवर्तनाची तळमळ दडलेली असावी. जर हे साधता आले, तरच लोकमान्य टिळकांची संकल्पना पुन्हा उजळून निघेल आणि गणेशोत्सव खऱ्या अर्थाने राष्ट्रजागृतीचे पर्व ठरेल. नाहीतर आपल्या पुढच्या पिढ्यांसमोर फक्त पोकळ सजावट आणि प्रदूषणाने भरलेला उत्सव उरेल, ज्यात टिळकांची मौलिकता हरवून जाईल. आणि मग खरा प्रश्न असा उरेल आपण पुढच्या पिढ्यांना काय देतो आहोत: जागृतीचा दीप की विकृत संस्कृती? मित्रांनो, आता ठरवायचे आहे ते आपल्यालाच. आपण हा उत्सव केवळ बाह्य दिखाव्याचा मेळावा बनवतोय की टिळकांच्या स्वप्नातील समाजजागृतीचा दीप पुन्हा पेटवतोय? आज प्रत्येक घराघरातून, प्रत्येक मंडपातून हा संदेश निघाला पाहिजे की ''गणपती बाप्पा मोरया'' म्हणजे फक्त गजर नव्हे, तर एक बदलाचा हुंकार आहे.



गुरुदत्त वाकदेकर
९९८७७४६७७६
साहित्यवार्ता

# गणेशोत्सव कालचा आणि आजचा



''निनाद'' चल, बाकी सगळं झालयं, तुझ्या मम्मीकडून आणि पठारे काकूंकडून दोन चार सुंदर साड्या घेऊन येऊ ! त्या मागे लावल्या की बाप्पाचं डेकोरेशन पुर्ण होईल.

१९९० चा काळ होता तो, स्थळ होतं इरिगेशन कॉलनी, मिरजगाव, अहमदनगर. आता जलसंपदा झालं. त्याकाळी गणेशोत्सव १० दिवसांचा असायचा, नाही म्हणजे आताही असतोच. परंतु त्या काळी तो सांस्कृतिक आणि मनोरंजनाच्या कार्यक्रमाने नटलेला असायचा.

आमचं बाल गणेश मंडळ होतं. मोठ्या लोकांचा मोठा मंडप असायचा ! त्यांचे कार्यक्रम पनं मोठे असायचे. गणपतीच्या शेवटच्या चार पाच दिवसात वेगवेगळे कार्यक्रम असायचे. एक दिवस नाटक किंवा ऑर्केस्ट्रा, एक दिवस मराठी चित्रपट, एक दिवस हिन्दी चित्रपट, एक दिवस जादूचे प्रयोग असं असायचं. १९८९-९० चं वर्ष होतं. मी, निनाद गडकरी, संदिप जोशी एकाच वर्गात म्हणजे आठवी- नववीला होतो. आमच्या जोडीला मगं संभाजी कोल्हे, इमरान शेख, बापू कांबळे, अरविंद रासकर, नितीन भोंडवे, शकोर सैय्यद, संजय बन, गणेश धुमाळ, समिर सैय्यद, प्रविण फुले ही सगळी मंडळी होती. यावेळी आम्ही ठरवलं होतं, मोठ्या लोकांप्रमाणे आपणही आपला स्वतंत्र गणपती बसवायचा.

प्राथमिक चर्चेत असं लक्षात आलं की आपण जबाबदार्या वाटल्या आणि थोडीशी मोठ्या लोकांची मदत घेतली तर काही अवघडं नव्हतं. गणपती मंडळाला अध्यक्ष असतो, मग सर्वानुमते मला अध्यक्ष जाहीर केलं गेलं. आरती आणि प्रसादाची जबाबदारी रोज एका कुटूंबावर सोपविण्यात आली, आणि त्यांनी सुद्धा ती आनंदाने स्विकारली होती. आम्ही छोटासा मंडप उभारला होता. तसं सगळं सुरळीत चाललं होतं, पण मुख्य अडचण पैशांची होती. आम्हाला धुमधडाक्यात यावर्षी गणेशोत्सव साजरा करायचा होता , त्यासाठी नाही म्हटलं तरी ५००-६०० रुपयांची गरज होती. मग आम्ही वर्गणी गोळा करायचं ठरवलं. कॉलनीतल्या प्रत्येक घरात जाऊन वर्गणी मागीतली, तरी जेमतेम ३०० रुपये जमा झाले होते. मग आम्ही आसपासची दुकाने, वाड्या वस्त्या फिरलो आणि सरतेशेवटी आमच्याकडे ६००-६५० रुपये जमा झाले होते. आता त्यातून गणपतीची मूर्ती, मागे लावायला पंखे, झिरमिळ्या, लाईटची माळ सगळं करुन सुद्धा ३०० रुपये शिल्लक होते. त्या पैशातून आम्ही व्हि. सी. आर वर दोन चित्रपट दाखवायचं ठरवलं होतं. मग आम्ही मिरजगावच्या त्याकाळी प्रसिद्ध असणाऱ्या ''सोना व्हिडिओ हॉल'' शी संपर्क साधला. दोन दिवशी दोन सिनेमे ठेवले होते. पहिल्या दिवशी ''नाम'' आणि दुसर्या दिवशी ''कर्मा''. चित्रपट व्हि.सी.आर. वर असूनसुद्धा मोठ्या लोकांच्या मोठ्या पडद्यावरच्या चित्रपटांपेक्षा आमचे चित्रपट लोकांना खूप आवडले होते.

गणेश विसर्जनासाठी कॉलनी तून गाड्या निघायच्या, त्या थेट निमगांव गांगर्डा येथील सिना धरणापर्यंत. आम्ही नाचत, गुलाल खेळतं मिरवणुकीत जायचो. त्यावेळी आम्हाला कधीही कुणीही सांगितले नाही. तुम्ही मुस्लिम आहात, हा हिंदूंचा सन आहे, तुम्ही यात सहभागी होऊ नका. आणि कुणी मुसलमानाने सुद्धा सांगितले नाही की तुम्ही मिरवणुकीत गेलात तर तुमचा धर्म भ्रष्ट होईल. दिंडीचं जेवणं तर उस्मान काकांचा हात लागल्याशिवाय तयारचं होतं नव्हतं. आज मागे वळून पहाताना खूप काही हरवल्या सारखं वाटतं. खरचं धर्म इतका कमकुवत आहे का? एक दुसर्या धर्माच्या लोकांच्या सहभागामुळे भ्रष्ट होईल? शिरखुर्म्याचा आस्वाद घेताना कुणालाही कधी असं वाटलं असेल का? शेवटी परमेश्वर / अल्लाह तुमच्या कृती पेक्षा तुमची श्रद्धा / इमान बघतो. ''माणुसकी'' ही धर्माची पहिली शिकवण का आपणं विसरून गेलो?...असो !

ते सोनेरी दिवस पुन्हा यावेत हिच अपेक्षा करुन थांबतो. पुन्हा एकदा गणेश चतुर्थीच्या सर्व मित्रपरिवारास हार्दिक हार्दिक शुभेच्छा!

इंजि. अनिस शेख
९८५०९००७८६
साहित्यवार्ता

## ९ कोटींच्या कामांचा शुभारंभ

**शेवगाव । रयत समाचार**

शहराच्या पाणीपुरवठा, स्वच्छता, रस्ते, वीज आणि नागरी सुविधा क्षेत्रात महत्त्वाचे विकासकाम सुरू करण्यात आले. ७२ कोटी रुपयांच्या जलयोजनेचा वेगाने प्रारंभ केला असून, त्याचबरोबर ९ कोटी रुपयांच्या विविध नागरी विकासकामांचे भूमिपूजन आमदार मोनिका राजळे यांच्या शुभहस्ते करण्यात आले. मुख्य ठरावीक कामांमध्ये १२ क्षमतेचे जलशुद्धीकरण केंद्र, ५५ किलोमीटर पाईपलाईन, शहरातील रस्ते मजबुतीकरण, डांबरीकरण, काँक्रिटीकरण, पेव्हिंग ब्लॉक, सौर पथदिवे, हायमास्ट, आर.सी.सी. गटार व वीज व्यवस्थापन यांचा समावेश आहे. आमदार राजळे यांनी कामाची त्वरित पूर्णता आणि पाईपलाईन नंतर रस्त्यांचे काम सुरुवात करण्याचे निर्देश दिले.